पुढारी

# आदिवासी आणि जंगल यांच्यातील हितगुज 'मर्मर्स ऑफ द जंगल'

**५२ व्या इफ्फीमध्ये 'इंडियन पॅनोरमा' या विभागात नॉन-फिचर गटात तसेच 'फिल्म बझार'च्या शॉर्टफिल्म्स रिकमंडेशन विभागातही 'मर्मर्स ऑफ द जंगल' ( मराठी/ २० मिनिटे) या माहितीपटाची निवड झाली आहे. आदिवासींमध्ये असणाऱ्या मिथकीय कथांचा शोध घेता घेता आदिवासी आणि जंगल यांच्यातील सहजीवन आणि हितगुज प्रायोगिकतेने उलगडण्याचा यात प्रयत्न आहे. त्यानिमित्ताने -**



## आदिवासींची येथेही उपेक्षाच..!

अशा निवडींसाठी जितके पूर्ण लांबीच्या कथापटांचे कौतुक होते, तितके ते लघुपट आणि माहितीपट यांच्या वाट्यास येत नाही. आदिवासींतकेच लघुपट आणि माहितीपट हे फॉर्म्स देखील माध्यमांच्या आणि प्रेक्षकांच्या परिघाबाहेर वंचित आणि उपेक्षित राहिलेले दिसतात. हे चित्र उलटेल, तो सुदिन!

माझी गोष्ट हि माझी न्हवं... बापजाद्यांपासून चालत आलेल्या गोष्टींचा ती भाग आहे... आमच्या पूर्वजांची स्वप्नं, कल्पना आणि आठवणींची ती गोळाबेरीज आहे! संथ लयीत सुरू होणाऱ्या आणि राहणाऱ्या 'मर्मर्स ऑफ द जंगल' या माहितीपटातील आदिवासींचे हे कथन आहे.

सोहील वैद्य याने दिग्दर्शनबरोबरच संकलन, कलरिस्ट अशा जबाबदाऱ्या निभावताना निर्मितीचेही एकलव्य-धनुष्य पेलले आहे. आदिवासी लोकपरंपरेतील प्रवाहित मिथक-कथांचाही मागोवा घेण्याचा येथे प्रयत्न आहे. आणि मग त्यास साजेसे ध्वनीसरंचना (विज्ञ दाहल) आणि ध्वनी-आरेखन( प्रद्युम्न चावरे) येथे येते. निवेदनाची लयही (सुमंत शिंदे व वर्षा गुप्ते) त्यास सुसंगतच आहे. जंगलात गेल्यानंतर जसे तेथील नैसर्गिक लयीतील शांतता मनात झिरपत जाते, तोच प्रत्यय कंपोझिशनमध्ये उतरवण्याची छायाचित्रणाची जबाबदारी दिग्विजय थोरात यांनी अगदी अल्लादपणे निभावली आहे. डिंभे धरण परिसरातील (ता.आंबेगाव, जि. पुणे) महादेव कोळी आदिवासी समूहातील सुनील भोईर, नितीन भोईर, बेबी भोईर, प्रदीप भोईर या चौघांना यात फॉलो केले आहे. त्यांना अगदी पोस्टरवरील श्रेयनामावलीतही स्थान दिले आहे. ही समूह श्रेय भावना चित्रपट निर्मितीतही खुप मोलाची असते.

सिनेमॅटिकली ही फिल्म खूपच सुंदर झालीये. फॉर्म म्हणून देखील हा आदिगुंजनाचा फील देणारा माहितीपट वेधक झाला आहे. एक गुढरम्यता लाभली आहे. मी एका तळ्यात तरंगतोय... मी डोळे उघडतो आणि जंगलाला आकार येतो! असे ट्रान्सडेंटल निवेदन केवळ टेक्स्ट न ठरता सबटेक्स्टमधूनही पाझरत राहते. आज्जी सांगायची - तू जंगलाला जेवढं उमजून घेशील तेवढं ते तुझा हिस्सा होईल, मग तू झोपी जाशील पर उठल्यावर जंगल असशील! हे वरकरणी अधिभौतिक वाटले, गूढ वाटले तरी भौतिकवादातूनही ही पारंपरिक शहाणीव समजून घेता येण्याजोगी आहे.

आदिवासींमध्ये निसर्ग प्रतिकांमध्ये देव पाहिला जातो.' माझी

**- डॉ. अनमोल कोठाडिया**

गोष्ट हि माझी न्हवं... बापजाद्यांपासून चालत आलेल्या गोष्टींचा ती भाग आहे...' या भूमिकेच्या पार्श्वभूमीवरच जेव्हा एक आदिवासी पिंपळात विष्णू वगैरे मानताना दिसतो, शिवाय एक आदिवासी दंतकथेत तथाकथित कनिष्ट जातीचा उल्लेख येतो. तेव्हा आदिवासींना 'वनवासी' संबोधता संबोधता घडविल्या जाणाऱ्या सांस्कृतिक कु-संकराची उदाहरणेच होत. हे आजच्या आदिवासींचे ऍक्च्युअल फुटेज जरी असले तरी ते सांस्कृतिक इतिहासाच्या पार्श्वभूमीवर संशोधित करून वापरणे आणि समजून घेणे महत्वाचे ठरेल. संस्कृतीच्या प्रवाहात मिसळल्या जाणाऱ्या अनेक भल्या-बुऱ्या गोष्टींची ही साक्ष आहे. राजकीय, सामाजिक अंगाने हा माहितीपट जात नसला तरी असे काही मुद्दे दृष्टीक्षेपात येतातच, त्यांचे सम्यक आकलन महत्वाचे ठरेल. आदिवासी बोली भाषेतीलच शीर्षक अधिक समर्पक ठरले असते.

Goa Edition
Nov 20, 2021 Page No. 5
newspaper.pudhari.co.in